पान ८ वर

- मराठा आरक्षणासाठी मंगळवारी विधानसभा अधिवेशन
- धनगर आरक्षणच्या याचिका फेटाळल्या
- राणे शेवटची सुट्टी देतोय

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## सागरी टेहळणीसाठी १५ विमाने खरेदी

**नवी दिल्ली :** नौदलासाठी टेहळणी करणारी नऊ विमाने खरेदी करण्याच्या प्रस्तावाला संरक्षण मंत्रालयाने शुक्रवारी मान्यता दिली. तसेच, भारतीय तटरक्षक दलासाठी आणखी सहा टेहळणी विमाने खरेदी करण्याच्या प्रस्तावासही मान्यता देण्यात आली. ही १५ टेहळणी विमाने भारतातच बनवण्यात येणार असून त्यासाठी २९ हजार कोटीचा प्रकल्प साकारण्यात येणार आहे, असे संरक्षण दलातील सूत्रांनी सांगितले. संरक्षण मंत्रालयाने बुधवारी १२.७ एमएम रिमोट कंट्रोल गन्स खरेदीचा एक हजार ७५२ कोटी रुपयांचा करार केला. ४६३ गन पुरवण्यात येणअर आहेत. या गनही संपूर्ण देशी बनावटीच्या आहेत. या गन्स नौदल आणि तटरक्षक दलाला देण्यात येणार आहेत.

www.surajyadigital.com ■ शनिवार, दि.१७ फेब्रुवारी २०२४ ■ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १३९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# आमदारांच्या घरांवर आंदोलकांची चाल

## प्रणिती शिंदे खवळल्या; भडकले आक्रमक मराठे!

### लोकप्रतिनिधींच्या घराला बसल्या कानठळ्या

### आमदारांबाबत गैरसमाज, प्रचंड राडा, घोषणाबाजी

### शाब्दिक वादावादी, ढकलाढकलीही

सुराज्य/खास प्रतिनिधी

**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या राजकीय वारदार कन्या आमदार प्रणिती शिंदे यांच्या सोलापुरातील सातरस्ता परिसरातील 'जनवात्सल्य' निवासस्थानाला आज शुक्रवारी (ता. १४) सकल मराठा आंदोलक समर्थकांनी वेढा दिला. यादरम्यान प्रणिती शिंदे मराठा आंदोलनकर्त्यांवर जाम भडकल्या. त्यावर 'ईट का जबाब पत्थरसे' याप्रमाणे सोलापुरी मराठेदेखील त्यांच्यावर भडकले. प्रणिती शिंदे यांनी स्वत:करुन घेतलेल्या गैरसमजातून शाब्दीक हल्याच्या जणू फैरीच यादरम्यान झडल्या. जनवात्सल्यवर चालून आलेल्या मराठ्यांना ज्या पद्धतीने त्यांनी जाब विचारण्याचा प्रयत्न केला, त्या तुलनेत संतापलेल्या मराठा आरक्षण योध्दांनी कैकपटीने प्रणिती शिंदे यांच्यावर तोंडसुख घेतले. यादरम्यान येथे आंदोलकांनी प्रचंड घोषणाबाजी केली त्यातून जनवात्सल्य निवासस्थानाला जणू कानठाळ्या बसल्या.**

कुणबी नोंद निघालेल्या मराठ्यांच्या सग्यासोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मसुदींचे कायद्यात रुपांतर करुन त्याची अमलबजावणी करण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटीत उपोषण सुरु केले आहे. उपोषणादरम्यान त्यांची प्रकृती चिंताजनक बनली. या टप्पावर श्री. जरांगे-पाटील यांच्या आरक्षणासंबंधीच्या मागणीला आमदारांनी पाठिंबा द्यावा, या मागणीचे निवेदन देण्यासाठी सोलापुरातील मराठा आरक्षण समर्थक एकत्र आले होते.

प्रारंभी मराठा आंदोलक काळजापूर मारुती परिसरातील भाजपचे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या निवासस्थानी पोचले. या ठिकाणी आंदोलकांनी प्रचंड घोषणाबाजी केली.

आरक्षणाच्या ५० टक्याच्या मर्यादेतून ओबीसीमधून मराठ्यांना आरक्षण देण्याच्या भूमिकेला पाठिंबा देण्याची मागणी आंदोलकांनी आमदार श्री. देशमुख यांच्याकडे केली. त्यावर मराठा समाजाच्या भूमिकेसोबत आपण आहोत, असे अभिवचन त्यांनी दिल्यानंतर आंदोलकांनी तेथील आपला ठिय्या उठविला.

होटगी रस्त्यावरील आमदार सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानीदेखील मराठा आंदोलनकर्त्यांनी चाल केली. तथापि, देशमुख हे दिल्लीत होते. आंदोलकांच्यावतीने त्यांना भ्रमणध्वनीवर संपर्क साधून मराठ्यांच्या भावना कळविण्यात आल्या. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मी पहिल्यापासून आग्रही आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

### आंदोलनादरम्यान प्रणिती शिंदेंना मराठ्यांचे सवाल...

- आजवर मराठ्यांच्या जीवावर खासदकारकी, आमदारकी तुमच्या परिवाराने भोगली, आता मराठ्यांची गरज उरली नाही का?
- मते मागायला मराठ्यांच्या दारात आता येणार नाही का?
- विरोधी पक्ष म्हणून तुम्ही जरांगे-पाटील यांचे उपोषण सुटण्यासंबंधी का भूमिका पार पाडत नाही?
- जरांगे-पाटलांचे उपोषण सोडण्याला विरोधी गटाचा एकही आमदार गेला नाही, म्हणून आम्ही आलोत निषेध करायला..
- केवळ तुमच्या निवासस्थानी आंदोलन करताय हे आपण केलेला आरोप अत्यंत चुकीचा
- काँग्रेसचे सगळे आमदार आहेत, तर त्यांना आमच्या भावना कळवा, व्हिडीओ कॉल दाखवा
- व्हिडीओ कॉल दाखवणार नसाल तर आपण खोटे बोलता हे सिध्द होईल
- आम्हाला आमचे जरागे-पाटील श्रेष्ठ, बाकी आमदार आमच्यासाठी शुन्य

### अन् प्रणिती शिंदेंनी बदलला नूर...

आपल्या जनवात्सल्य निवासस्थानीच मराठा आंदोलकांनी धडक मारुन राडा सुरु केला आहे, असा समज सुरवातीला आमदार प्रणिती शिंदे यांचा झाला.त्यातूनच त्यांनी आंदोलक मराठ्यांना सुनावण्याचा प्रयत्न केला. मात्र, सोलापुरातीलच नव्हे, तर महाराष्ट्रातील आमदारांच्या निवासस्थानी मराठा आंदोलक जात आहेत, असे पोलीस अधिकारी यांची साक्ष देत माऊली पवार यांनी प्रणिती शिंदे यांना सांगितले. तेव्हा त्यांचा नुर पालटला. मराठा समाजाच्या भावनेसोबत आम्ही आहोत, २० तारखेच्या अधिवेशनात या समाजाला आरक्षण मिळण्यासंबंधीची सकारात्मक भूमिका आम्ही काँग्रेसचे सर्व आमदार घेत आहोत, अशी भूमिका प्रणिती शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केली.



स्थळ : डफरीन चौक,आमदार विजयकुमार देशमुख निवासस्थान



स्थळ : सातरस्ता,जनवात्सल्य निवासस्थान



### देशमुखांचा थेटच देवेंद्र फडणवीसांना फोन...

आरक्षणासाठी प्रचंड तापलेल्या वातावरणादरम्यान मराठा आंदोलकांनी जेव्हा आमदार विजयकुमार देशमुख यांच्या निवासस्थानाला गराडा घातला. राडा सुरु केला त्यादरम्यान देशमुख यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट भ्रमणध्वनी लावून सोलापुरातील मराठा समाजाच्या तीव्र भावानांबद्दल सांगितले. त्यावर फडणवीस यांनी आरक्षणासंबंधी अश्वस्त केले. या समाजच्या भावनांचा आम्ही कदर करीत आहोत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावर काम करीत आहेत. टिकणारे आरक्षण देण्यासंबंधी सरकार कटिबद्ध आहे, असे फडणवीस यांनी देशमुख यांना सांगितले.



स्थळ : होटगी रोड,आमदार सुभाष देशमुख

### ...अन् फडणवीसांकडून फोनकट

सोलापुरातील मराठ्यांच्या भावनांबद्दल सुरवातील देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत आमदार विजयकुमार देशमुख बोलले. त्यानंतर देशमुख यांनी भ्रमणध्वनी मराठा समाज समवन्यक माऊली पवार यांच्याकडे दिला. पवार यांचा संवाध फडणवीस यांच्यासोबत सुरु झाला.' मंत्रीमंडळातील तुमचे सहकरी छगन भूजबळ हे जरांगे-पाटील यांना पर्यायाने मराठ्यांना बोलत आहेत. अ‍ॅड. सदारत्न गुणवर्ते हेदेखील बोलत आहेत. त्यांना समजून सांगा. शिवास तो तुमचा कोंबडीचोर नारायण राणे हेदेखील बोलत आहे. हा शब्द प्रयोग ऐकताच श्री. फडणवीस यांनी फोन बंद केला.

### दिल्ली दरबारी आमदार सुभाष देशमुखांना फोन, गाठ मराठ्यांशी असल्याचा दिला इशारा

दिल्ली दरबारी असलेल्या आमदार सुभाष देशमुख यांना मोबाईलवर संपर्क साधण्यात आला. यावेळी झालेल्या संवादादरम्यान देशमुख यांना आंदोलकांनी इशारा दिला. आंदोलक म्हणाले, महाराष्ट्रातील ५ कोटी मराठ्यांचे नेतृत्व करणाऱ्या जरांगे-पाटील यांची अव्हेलना करु नका. सात दिवस झाले त्यांच्या उपोषणाला. एकही आमदार आणि खासदार त्यांच्याकडे फिरकला नाही. जरांगे-पाटील यांना हलक्यात घेऊ नका.. सरकारच्या मुंडीवर पाय देऊन आम्ही आरक्षण घेऊच. पण जरांगे पर्यायाने मराठ्यांची जी अव्हेलना सुरु आहे, त्याची किंमत भविष्यात मोजावी लागेल.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



माझ्यासोबत जे झालं ते तुझ्यासोबत व्हायला नको!

कल्याण
447-52-237

मुंबई
124-77-223

# रणजितसिंह 'दस का दम'@१ लाख कोटी

## श्रेष्ठींना म्हणालो, लोकसभेची उमेदवारी कोणालाही द्या!

सोलापूर/शिवाजी भोसले

**विकास हाच 'श्वास अन् ध्यास' मानला. वचनपूर्ती खऱ्या अर्थाने पूर्ण करण्यासाठी सहकाऱ्यांसह रात्रीचा दिवस करुन राबत राहिलो. साधारण साडेचार वर्षात 'न भूतो न भविष्यती' असा मतदार संघात तब्बल १ लाख कोटींच्या विकास कामांचा डोंगर उभा केला. देशातील लोकसभेच्या खासदरांच्या टॉप 'टेन'मध्ये आलो. विकास कामात पुऱ्या हिंदुस्थानात ८ व्या स्थानी राहिलो...अजून काय हवे? धन्य झाल्याचा फिल येतोय...श्रेष्ठींना थेटपणाने म्हणालो, 'लोकसभेची उमेदवारी कोणालाही द्या! मी भाजपचा सामान्य कार्यकर्ता म्हणजेच या पक्षाचा निष्ठावंत शिलेदार म्हणून पक्षाने, श्रेष्ठींनी दिलेल्या उमेदवाराचे काम करीन... माढा लोकसभेचे भाजप खासदार रणजिसिंह नाईक-निंबाळकर सांगत होते.**

दैनिक 'सुराज्य'शी त्यांनी जो संवाद साधला, तो नेहमीच्या स्टाईलने धडक-बेधडक पण अत्यंत अभ्यासपूर्ण. माढा मतदारसंघामधील मतदारांना जे वचन दिले होते. ती वचनपुर्ती कशी केली? विकासाचा डोंगर रचताना काय झाले? कोणत्या अडचणी आल्या? कसे राजकारण शिजवले गेले? पण त्यातूनही मार्ग काढत अटकेवार झेंडा कसा रोवला? याची 'जादूई झुप्पी' सांगितली.

(पान ३ वर)

### 'माढ्याचा राजा'

मतदारसंघात कर्तृत्वाचे विविध पैलू पाडत विकासाची गंगा वाहती करणाऱ्या खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'माढ्याचा राजा' अशी ओळख आहे. विशेषत्वे, त्यांना माढ्याचा राजा हे उपाधी खुद्द मोदी-फडणवीस यांनी दिली आहे. प्रधानमंत्री मोदी यांच्या भेटीला गेल्यानंतर नाईक-निंबाळकर यांना 'और कुछ रह गया है क्या' असे विचारतात. मोदींना भेटण्यासाठी प्रतिक्षेत थांबावे लागत नाही.यापेक्षा अजून काय हवे? मोदी-फडणवीस यांनी जी विकासासाठी उर्जेची जी शिदोरी दिली ती 'सरतही नाही अन् उरतही नाही' असेही नाईक-निंबाळकर यांनी सांगितले. मोदी, फडणवीस है तो मुमकीन है हे सूत्र आपल्यासाठी आहे, असे ते म्हणाले. सर्व आमदार, पदाधिकारी, अधिकारी, सहकारी टीम यामुळेच हा विकास शक्य झाला.

